# जाहिर सुचना

# खालील पदांच्या गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुळ कागदपत्र पडताळणी व समुपदेशन

# दि.०८/०४/२०२२ वेळ सकाळी १०:३० वाजता

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदाच्या पदभरती करीता दि.२४/१२/२०२१ ते १०/०१/२०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने खालील पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या आधारे खालील पदांच्या अपात्र उमेदवारांची यादी, पात्र उमेदवाराची यादी व गुणानुक्रमे मुळ कागदपत्र पडताळणी व समुपदेशन करीता उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

1) Medical Officer MBBS
2) Audiometrician/Audiologist/Audiologist & Speech Therapist
3) MO Dental
4) Dental Technician
5) Medical Officer RBSK
6) Physiotherapist
7) Psychologist
8) Optometrist

याव्दारे उमेदवारांना सुचित करण्यात येते की, **दि.०८/०४/२०२२ रोजी वार शुक्रवार सकाळी १०:३० वाजता, जिल्हा परिषद, शिवाजी चौक लातूर** येथे खालील उमेदवारांनी त्यांच्या मुळ कागदपत्र व अनुभव प्रमाणपत्र सक्षम अधिकारी (जिल्हा आरोग्य अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक/आरोग्य अधिकारी मनपा इत्यादी) यांच्या स्वाक्षरीचे कागदपत्र पडताळणीच्या वेळेस तपासणी करीता उपलब्ध करुन देण्यात यावे. अन्यथा आपण सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्राच्या छायाकिंत प्रतीच्या आधारे अनुभवासाठी देण्यात आलेले गुण गृहित धरण्यात येणार नाहीत व देण्यात आलेले गुण कमी करण्यात येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदर यादीतील उमेदवारांना गुणानुक्रमे प्रवर्गनिहाय १:३ (एकास तीन) या प्रमाणे कागदपत्र पडताळणीकरीता बोलविण्यात येत असून उमेदवाराच्या मुळ कागदपत्राच्या पडताळणी नंतर प्रवर्गनिहाय अंतिम गुणवत्ता यादी तयार करुन त्याच दिवशी रिक्त असलेल्या ठिकाणी गुणवत्तेनुसार समुपदेशनाव्दारे निवड करण्यात येईल.

**समुपदेशनाच्या दिनांक व वेळेत उमेदवारांने उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तदनंतर उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

(डॉ.एल.एस देशमुख)
जिल्हा शल्य चिकित्सक
लातूर.